# महाराष्ट्र शासन

क्रमांक: सीएआर-२०१९/प्र.क्र.१६२/का.१०
विधि व न्याय विभाग,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ०७ एप्रिल, २०२१

## वाहन विक्री संदर्भात नियम, अटी व शर्ती

| अ.क्र. | नियम व अटी |
|---|---|
| १ | मोहोरबंद पाकीटात वाहन खरेदी निविदा समक्ष दिनांक०८.०४.२०२१ ते २३.०४.२०२१ या कालावधीत सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कक्ष अधिकारी/का.१० (नोंदणी शाखा), दालन क्रमांक ३४५ (विस्तार), तिसरा मजला, विधि व न्याय विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ येथे सादर करावी. त्यावर "क्रमांक एमएच-०१-झेडए-००९१ ( वॅगन आर ) या वाहनाच्या खरेदीसाठी निविदा" असा स्पष्ट उल्लेख असावा. |
| २ | "जशा आहेत तशा स्थितीत" विक्रीकरिता असलेले क्रमांक एमएच-०१-झेडए-००९१ (वॅगन आर ) हे वाहन तपासणीसाठी मंत्रालय इमारतीच्या समोरील नवीन प्रशासकीय भवन आवारात ठेवण्यात आले आहे. |
| ३ | ज्यांना रजिस्टर पोस्टाने निविदा पाठवावयाची आहे, त्यांनी निविदा कोणत्याही परिस्थितीत दिनांक २३.०४.२०२१ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत या कार्यालयास कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत प्राप्त होईल याची दक्षता घ्यावी. अथवा वरील कालावधीत समक्ष सादर करावी. वाहन खरेदी निविदेसोबत कोणतेही एक ओळखपत्र जोडणे आवश्यक आहे. |
| ४ | इसाऱ्याची रक्कम रु.५०००/- (प्रत्येक निविदेस ) कक्ष अधिकारी/का.१० (नाेंदणी शाखा), दालन क्रमांक ३४५ (विस्तार), तिसरा मजला, विधि व न्याय विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे रोख जमा करावी. |
| ५ | इसाऱ्याची रक्कम रोख भरल्यानंतर कक्ष अधिकारी, रोखशाखा, विधि व न्याय विभाग यांच्याकडून प्राप्त झालेली पावती, वाहन खरेदी निविदा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. इसाऱ्याची रक्कम भरल्याबाबतचा पुरावा सोबत सादर केलेला नसल्यास निविदा ग्राह्य धरली जाणार नाही. |
| ६ | निविदा उघडण्याच्या वेळी निविदाधारकास हजर रहाता येईल. |
| ७ | वाहन खरेदीची अधिकतम किंमतीची निविदा रोख रक्कम भरुन दोन आठवड्यात वाहनाचा प्रत्यक्ष ताबा घेणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची निविदा रद्दबातल ठरविली जाईल व इसाऱ्याची रक्कम जप्त करण्यात येईल. |

| | |
|---|---|
| ८ | वस्तु व सेवाकर अधिनियमानुसार, यशस्वी निविदाधारकास आवश्यक तो वस्तु व सेवा कर (GST) भरावा लागेल. तसेच, वस्तु व सेवा कर (GST) भरल्याचा पुरावा शासनास सादर करावा लागेल. |
| ९ | यशस्वी निविदाधारक नियम व अटीनुसार करार पूर्ण करु शकत नसल्याचे दिसून आल्यास त्याने भरलेल्या इसाऱ्याची रक्कम जप्त करण्यात येईल. |
| १० | दरामध्ये तसेच निविदा कागदपत्रात कोठेही खाडाखोड, overwriting,पांढरी शाई लावणे टाळावे. चुकून तसेच करावे लागल्यास पूर्ण स्वाक्षरी करावी. तसे न केल्यास निविदा रद्द करण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवले आहेत. |
| ११ | कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा फेटाळण्याचा अधिकार सचिव व वरिष्ठ विधि सल्लागार, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांना राहतील. |
| १२ | शासकीय वाहन क्रमांक एमएच-०१-झेडए-००९१ ( वॅगन आर )च्या हस्तांतरण नोंदणीबाबत सर्व प्रक्रिया यशस्वी निविदाधारकास स्वखर्चाने करावी लागेल. |
| १३ | उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, मुंबई (मध्य ताडदेव) यांनी कळविल्यानुसार वाहनाची विक्री खाजगी व्यक्तीला करण्यात आल्यास रु. २७,८१४/- इतका तर संस्थेला वाहनाची विक्री केल्यास रु.५०,५७२/- इतका एक रकमी वाहन कर भरावा लागणार आहे. सदर खर्च वाहन खरेदी करणाऱ्या व्यक्तीने करावयाचा आहे. त्याशिवाय वाहन हस्तांतरण खर्चही खरेदीदाराने करावयाचा आहे. |
| १४ | वाहन खरेदीची निविदा सादर करण्यापूर्वी अर्जदाराने नवीन प्रशासकीय भवन परिसरात ठेवण्यात आलेल्या वाहनाची पहाणी करावी. वाहन ज्या स्थितीत आहे त्याच स्थितीत त्याची विक्री करण्यात येणार आहे. |

Mahendra Shantaram Pujari

Digitally signed by Mahendra Shantaram Pujari
DN: CN = Mahendra Shantaram Pujari, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Law & Judiciary Department
Date: 2021.04.07 16:18:31 +05'30'

**(म. शां. पुजारी)**
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

कक्ष अधिकारी, रोखशाखा, वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई.

| | निविदा क्रमांक | | १ |
|---|---|---|---|
| १ | निविदाधारकाचे संपूर्ण नाव | : | |
| २ | निविदाधारकाचा संपूर्ण पत्ता, मोबाईल क्रमांक / दूरध्वनी क्रमांक व ई-मेल आय डी | : | |
| ३ | निविदाधारक कंपनी असेल तर कंपनीचा संपूर्ण पत्ता, दूरध्वनी क्रमांक व ई-मेल आय डी | : | |
| ४ | वस्तु व सेवा कर (GST) नोंदणी क्रमांक (लागू असल्यास) | : | |
| ५ | इसाऱ्याची रक्कम भरलेली पावती क्रमांक व दिनांक | : | |
| ६ | निविदा सादर करावयाचा दिनांक | : | दि.०८.०४.२०२१ ते दि.२३.०४.२०२१ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| ७ | निविदा उघडण्याची तारीख | : | ---- |

प्रति,

कक्ष अधिकारी/का.१० (नोंदणी शाखा),
दालन क्रमांक ३४५ (विस्तार), तिसरा मजला,
विधि व न्याय विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.

विषय :- शासकीय वाहन क्रमांक एमएच-०१-झेडए-००९१ ( वॅगन आर ) च्या खरेदीबाबत.

महोदय,

आपली निविदा सूचना क्र. सीएआर-२०१९/प्र.क्र.१६२/का.१० च्या संदर्भात कक्ष अधिकारी/का.१० (नोंदणी शाखा), दालन क्रमांक ३४५ (विस्तार), तिसरा मजला, विधि व न्याय विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांनी प्रसिध्द केलेल्या वाहन विक्री जाहिरात पत्रकासोबत किंवा निविदा नमुन्यासोबत जोडलेल्या नियम व अटीनुसार मी / आम्ही वाहन क्रमांक एमएच-०१-झेडए-००९१ ( वॅगन आर ) हे रुपये --------------------/-(अक्षरी रु. ------------------------------------------------ फक्त) एवढी किंमत देऊन खरेदी करु इच्छितो.

मी / आम्ही निविदेबाबतच्या सर्व नियम व अटी मान्य करतो.

आपला विश्वासू,

(निविदाधारकाची सही)
संपूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांक

**टिप :-** कंपनीच्या वतीने वाहन खरेदी केल्यास कंपनीचा संपूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांक प्रामुख्याने देण्यात यावा.

# महाराष्ट्र शासन

क्रमांक : सीएआर-२०१९/प्र.क्र.१६२/का.१०
विधि व न्याय विभाग,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- ०७ एप्रिल, २०२१

## निविदा सूचना

सचिव व वरिष्ठ विधि सल्लागार, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ हे त्यांच्या विभागातील शासकीय वाहन क्रमांक एमएच-०१-झेडए-०००९१ (वॅगन आर) या जुन्या (।u २००९ चे मॉडेल) वाहनाच्या विक्रीकरिता मोहोरबंद निविदा मागवित आहेत.

२. सदर निविदा दि.०८.०४.२०२१ ते दि.२३.०४.२०२१ रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत पोहोचतील अशा पध्दतीने मोहोरबंद पाकिटात पाठवाव्यात. विहित कालामर्यादेत प्राप्त निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ कळविण्यात येईल. निविदा उघडतेवेळी निविदाधारकास उपस्थित राहण्यास परवानगी आहे.

३. कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्विकारण्याचे वा नाकारण्याचे अधिकार सचिव व वरिष्ठ विधि सल्लागार, विधि व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांचेकडे राखून ठेवले आहेत, याची कृपया नोंद घ्यावी.

Mahendra
Shantaram Pujari

Digitally signed by Mahendra Shantaram Pujari
DN: CN = Mahendra Shantaram Pujari, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Law & Judiciary Department
Date: 2021.04.07 16:18:53 +05'30'

(म. शां. पुजारी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन